**ठळक बातम्या**

- सायबर गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी सरकार सायबर प्रयोगशाळांचं जाळं अधिकाधिक मजबूत करत असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन
- जागतिक आरोग्य दिनानिमित्त सर्वत्र विविध जनजागृतीपर कार्यक्रम

- अमेरिकेच्या टॅरिफ धोरणांमुळे शेअर बाजारांमधे मोठी घसरण/ मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्सची ३ हजारपेक्षा जास्त अंकांनी घसरगुंडी

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत मुंबई इंडियन्सचा सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूशी आज मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर

**<><><><><>**

सायबर गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी सरकार सायबर प्रयोगशाळांचं जाळं अधिकाधिक मजबूत करत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. मुंबईत डी बी मार्ग पोलीस ठाण्यात सायबर प्रयोगशाळेचं उद्घाटन मुख्यमंत्र्यांनी केलं, त्यावेळी ते बोलत होते. वरळी पोलीस ठाणे आणि गोवंडी पोलीस ठाण्यातल्या प्रयोगशाळांचं मुख्यमंत्र्यांनी ऑनलाईन उद्घाटन केलं. यासह मुंबई पोलिसांच्या इतर उपक्रमांचंही उद्घाटन मुख्यमंत्र्यांनी केलं. त्यात मोबाइल फॉरेन्सिक व्हॅन, अत्याधुनिक दुचाकी यांचा समावेश आहे.

या प्रयोगशाळांमध्ये जगातलं अद्ययावत तंत्रज्ञान उपयोगात आणलं जाणार आहे. ऑनलाईन पद्धतीने पैशांची हेराफेरी करणं, बँक खातं हॅक करणं अशा पद्धतीच्या गुन्ह्यांवर प्रयोगशाळेच्या माध्यमातून नियंत्रण मिळविण्यात येणार आहे.

**<><><><><>**

'डिजिटल स्कूल' या संकल्पनेअंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यातल्या १११ शाळांमधे इंटरॅक्टिव्ह टच पॅनल आणि डिजिटल ई लर्निंग सॉफ्टवेअरचं लोकार्पण आज विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या हस्ते दूरदृष्यप्रणालीद्वारे करण्यात आलं. कार्यक्रमाला जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी तसंच जिल्ह्यातले गटविकास अधिकारी, शिक्षक, विद्यार्थी तसेच पालक उपस्थित होते. या कार्यक्रमात जिल्हा परिषद शाळेतल्या दोन विद्यार्थ्यांनी शिंदे यांच्याशी ऑनलाईन संवाद साधला.

**<><><><><>**

आरोग्यविषयक जागरूकता वाढवण्यासाठी आज जगभरात सर्वत्र आरोग्य दिवस साजरा केला जात आहे. जागतिक आरोग्य संघटनेची स्थापना १९४८ मध्ये या दिवशी झाली. या वर्षीच्या आरोग्य दिवसाची मध्यवर्ती संकल्पना निरोगी सुरुवात, आशादायक भविष्य अशी आहे. माता आणि नवजात बालकांच्या आरोग्यावर लक्ष केंद्रित करणं हा या संकल्पनेमागचा हेतू आहे. येत्या आंतरराष्ट्रीय योग दिवसाला ७५ दिवस उरलेले असताना आयुष मंत्रालयांतर्गत मोरारजी देसाई योग संस्थेनं आजपासून ७५ दिवसांच्या योग महोत्सवाचं ओडिशामध्ये भुवनेश्वर इथं आयोजन केलं आहे.

जागतिक आरोग्य दिनानिमित्त आज राज्यात विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. मुंबईत महाराष्ट्र आरोग्य सन्मान सोहळा-२०२५ या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं असून यावेळी आरोग्य सेवा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्थांचा गौरव करण्यात येणार आहे तसंच विविध आरोग्य सेवा योजनांचा प्रारंभही करण्यात येणार आहे. ६ जिल्ह्यांमधे डायलिसिस सुविधेचं उद्घाटन, ई सुश्रुत या संकेतस्थळाचा विस्तार, शुश्रुषागृह नोंदणी प्रणालीचं ऑनलाईन प्रमाणपत्र वितरण, इत्यादी उपक्रमांचा त्यात समावेश आहे. अधिक सुदृढ आणि निरोगी जग निर्माण करण्याचा संकल्प प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी

जागतिक आरोग्य दिनानिमित्त दिलेल्या संदेशात पुन्हा एकदा व्यक्त केला आहे. कोणत्याही प्रगतीशील समाजाचा पाया आरोग्य हाच असतो, असं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

केंद्रीय आयुष मंत्रालयाने मोरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्थानाच्या सहकार्याने आज सकाळी कलिंगा मैदानात योग महोत्सवाचं आयोजन केलं होतं. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते या महोत्सवाचं उद्घाटन झालं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या २७ एप्रिल रोजी मन की बात या कार्यक्रमाद्वारे आकाशवाणीवरुन देशोदेशीच्या श्रोत्यांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा १२१वा भाग असेल. कार्यक्रमाकरता आपल्या सूचना किंवा प्रश्न १८०० – ११ – ७८०० या टोलफ्री क्रमांकावर नोंदवता येतील. नरेंद्र मोदी ॲप किंवा मायगोव्ह ओपन फोरम द्वारे देखील सूचना नोंदवता येतील. येत्या २५ तारखेपर्यंत येणाऱ्या सूचनांचा विचार करण्यात येईल

**<><><><><>**

भारतीय शेअर बाजारावर आज आठवड्याच्या सुरुवातीलाच तीव्र घसरण पाहायला मिळाली आहे. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स तीन हजारांपेक्षा जास्त अंकांनी घसरला असून निफ्टी १ हजारांहून अधिक अंकांनी घसरला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीर केलेल्या टॅरिफ घोषणांमुळे व्यापार क्षेत्रात तयार झालेला ताण आणि अमेरिकेत मंदी येण्याच्या भीतीचा तीव्र परिणाम भारतीय शेअर बाजारांवर दिसत आहे. दुपारच्या सत्रात या घसरणीचा वेग मंदावला आहे.

सध्या सेन्सेक्स २ हजार ७००पेक्षा जास्त अंकांनी घसरून ७२ हजार ६०० अंकांच्या आसपास व्यवहार करतो आहे. तर निफ्टीही ८००पेक्षा जास्त अंकांनी घसरून २१ हजार ९०० अंकांच्या आसपास व्यवहार करतो आहे.

<><><><><>

रिझर्व्ह बँकेच्या चलनविषयक धोरण समितीची तीन दिवसीय बैठक आजपासून मुंबईत सुरू झाली. २०२५-२६ या आर्थिक वर्षातली ही पहिलीच बैठक आहे.

<><><><><>

देशाच्या तिन्ही सशस्त्र दलांच्या महिला अधिकाऱ्यांच्या मुंबई ते सेशेल्स समुद्रप्रवासाला आज प्रारंभ झाला. भारतीय लष्कर, नौदल आणि हवाई दलाच्या एकंदरीत १२ महिला अधिकाऱ्यांनी एकत्रितपणे अशी मोहीम पहिल्यांदाच हाती घेतली आहे. या वर्षी जगप्रदक्षिणेला निघण्यापूर्वीची ही सराव मोहीम असेल.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू पोर्तुगाल आणि स्लोव्हाकियाच्या दौऱ्यावर असून काल त्या  पोर्तुगालमध्ये पोहोचल्या आहेत. गेल्या २७ वर्षांमधली भारताच्या राष्ट्रपतींची ही पहिली पोर्तुगाल भेट आहे. या भेटीमुळे भारताच्या पोर्तुगालसोबतच्या संबंधांना नवी चालना मिळेल.

स्लोव्हाकिया दौऱ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू स्लोव्हाकियाचे राष्ट्राध्यक्ष पीटर पेलेग्रिनी आणि प्रधानमंत्री रॉबर्ट फिको यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करतील.

<><><><><>

मुंबई विद्यापीठ तसंच राज्य सरकारचा राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोग यांच्या सहकार्यानं राबवण्यात आलेल्या १० प्रकल्पांपैकी ३ प्रकल्पांची पेटंटस मंजूर झाली आहेत. ३२ शिक्षकांसह १६१ विद्यार्थ्यांना आणि ४ शेतकऱ्यांना या

संशोधन प्रकल्पांचा लाभ झाला आहे, तसंच ५ अकुशल कामगारांना प्रशिक्षण मिळालं. रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि पालघर जिल्ह्यातल्या संलग्न महाविद्यालयातून १९० प्राथमिक संशोधन प्रस्ताव विद्यापीठाला मिळाले होते.

**<><><><><>**

कॉमेडियन कुणाल कामराने मुंबई पोलिसांनी त्याच्याविरोधात दाखल केलेल्या एफआयआरला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विडंबनात्मक वक्तव्य केल्याबद्दल कामराविरुद्ध प्रथम माहिती अहवाल दाखल करण्यात आला आहे. राज्यघटनेनं दिलेल्या अभिव्यक्ती आणि भाषण स्वातंत्र्यासह मूलभूत अधिकारांवर घाला घालणारी ही कारवाई असल्याचा दावा कामरानं गेल्या शनिवारी दाखल केलल्या याचिकेत केला आहे. या याचिकेवर २१ एप्रिलला सुनावणी होणार आहे. शिवसेना आमदार मुरजी पटेल यांच्या फिर्यादीनंतर पोलिसांनी कामराविरुद्ध २४ मार्चला गुन्हा दाखल केला होता.

**<><><><><>**

बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातला आरोपी अक्षय शिंदे याच्या मृत्यू प्रकरणात पाच पोलिसांविरुद्ध गुन्हे दाखल करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने आज दिले. या प्रकरणात आणखी चौकशी होण्याची गरज न्यायालयाने यावेळी व्यक्त केली. यासाठी सहआयुक्त लखमी गौतम यांच्या अध्यक्षतेखाली एसआयटी स्थापन करण्याचे आदेशही उच्च न्यायालयाने दिले आहेत. शिंदे याच्या मृत्युप्रकरणात आरोपी पोलिसांवर गुन्हे दाखल न करण्याच्या राज्य सरकारच्या भूमिकेवरही उच्च न्यायालयाने ताशेरे ओढले आहेत.

**<><><><><>**

भारताचा टेनिसपटू रोहन बोपण्णा आणि त्याचा अमेरिकन जोडीदार बेन शेल्टन यांनी फ्रान्समधे सुरू असलेल्या मोन्ते कार्लो मास्टर्स स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. बोपन्ना आणि शेल्टन यांनी काल झालेल्या सामन्यात

अर्जेंटिनाचा फ्रान्सिस्को सेरुंडोलो आणि चिलीचा अलजेन्द्रो यांचा ६-३, ७-५ असा पराभव केला.

पुरूष दुहेरीच्या पहिल्या फेरीत भारताचा युकी भांबरी आणि त्याचा जोडीदार अलेक्सी पोपेरीन यांचा सामना जर्मनीचा जान-लेनार्ड स्ट्रफ आणि ऑस्ट्रेलियाचा ॲलेक्स डी मिनौर यांच्याशी आज होणार आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत मुंबई इंडियन्सचा सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूशी आज मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर होणार आहे. खेळ संध्याकाळी साडेसातला सुरु होईल.

<><><><><>

विश्वविजेता रुद्रांक्ष पाटील यानं ब्युनोस आयर्स इथं सुरू असलेल्या आयएसएसएफ नेमबाजी विश्वचषक स्पर्धेत १० मीटर एअर रायफलमध्ये पुरुषांच्या गटात सुवर्ण पदक पटकावलं. विश्वचषक स्पर्धेतलं हे त्याचं दुसरं वैयक्तिक सुवर्णपदक आहे.

<><><><><>

भारतीय हवामानशास्त्र विभागाने राज्यात आज उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. कोकणात उष्ण आणि दमट वातावरण राहण्याची शक्यताही हवामान विभागाने वर्तवली आहे. या दरम्यान, पश्चिम बंगालच्या आग्नेय दिशेला उपसागरामध्ये चक्रीवादळ निर्माण होत असल्याचं निरीक्षणही हवामान विभागाने नोंदवलं आहे.

//<><><><><>//